**परिशिष्ठ - १ : महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्प (एम.ए.सी.पी) चा अंतिम आराखडा व त्याचे व्याप्तीमध्ये केलेल्या महत्वाच्या बदलांचा सारांश**

---

**(अ) प्रकल्पाच्या उद्देश्यांबाबत केलेले बदल :**

**(१) प्रकल्पाची वैशिष्ठे :-** प्रकल्पाची सुधारीत उद्दीष्ठे खालीलप्रमाणे आहेत.

अ) कृषी उत्पादकता व विक्रीयोग्य शेतमालाचे उत्पादन वाढविणे.

ब) शेक-यांना जादा विपणन संधी उपलब्ध करून देण्यासाठी, स्पर्धाक्षम बाजारपेठ व्यवस्थेला सहाय्य करणे.

**(ब) प्रकल्प आराखड्यामध्ये केलेले बदल :**

**(२) प्रकल्प आराखडा :** सुधारीत प्रकल्प उदीष्ठाप्रमाणे, प्रकल्पातील घटकांचा सुधारीत क्रम खालीलप्रमाणे आहे.

- **घटक अ :** बाजारपेठेस सहाय्यकारी सेवांचे बळकटीकरण.
  - अ - १. बाजारपेठ आधारीत कृषी तंत्रज्ञाचा प्रसार.
  - ब - २. कृषी उद्योग विकास सुविधा.
  - क - ३. बाजारपेठ माहीती सेवा.
  - ड - ४. पशुधन सहाय्य सेवा.
- **घटक ब :** शेतक-यांसाठी जादा बाजारपेठ सुविधा निर्माण करणे.
  - ब - १ : पर्यायी बाजारपेठ व्यवस्थांना प्रोत्साहन देणे.
    - ब - १ (१) शेतकरी उत्पादक गट / शेतकरी सेवा केंद्रांचे मार्फत शेतीमालाची साठवणूक व व्यवस्था.
    - ब - १ (२) वेअरहाऊस पावती सुविधा.
    - ब - १ (३) आठवडी बाजार सुधारणा.
    - ब - १ (४) ई-मार्केटींग सुविधा.
  - ब - २ : सध्याच्या बाजारपेठांमध्ये सुधारणा करणे.
    - ब - २ (१) ठोक विक्री बाजारपेठांची सुधारणा.
    - ब - २ (२) जनावरांचे बाजार आवारमध्ये सुधारणा.
- **घटक क :** प्रकल्प व्यवस्थापन

**(क) दुग्धव्यवसाय व मच्छीपालन क्षेत्रात प्रकल्पातून करावयाचे गूंतवणूकीबाबत :**

**(३)**जागतीक बँकेच्या शिफारशीनुसार, दुग्धव्यवसाय व मच्छीपालन क्षेत्रात पणन विषयक करावयाची गुंतवूक पुढे ढकलण्यात येत आहे. त्यामुळे होणारी बचत अंदाजे १७० कोटी (१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) प्रकल्पाच्या इतर घटकांवर पुन्हा तरतूद करण्यात येईल. परिणामतः प्रकल्पाची अंदाजित रक्कम पुर्वीप्रमाणेच सुमारे १३० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स राहील. (त्यामध्ये जागतिक बँकेचा (IDA) हिस्सा ९० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स, महाराष्ट्र शासन हिस्सा १० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स व अपेक्षित लाभार्थी हिस्सा ३० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स असेल.)

**(ड) घटक निहाय खर्चाच्या तरतूदीमध्ये केलेले बदल :**

**(४)** पर्यायी बाजारपेठ व्यवस्थांमध्ये जादा गुंतवणूक करण्याच्या उद्देशाने, घटकनिहाय खर्चाच्या तरतूदीमध्ये बदल केले आहेत.

**(५)** एकूण शेतकरी सामुदायिक सेवा केंद्रांची संख्या २०० वरून ५०० इतकी वाढविण्यात येईल. तसेच यातील संपादणूकीचे काम सामुदायिक सेवा केंद्र व संबंधीत संस्थाकडे सोपविण्यात येईल.

**(६)** वेअरहाउस अर्थसहाय्य करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत करावयाची गुंतवणूक २० ऐवजी ४० गोदामांसाठी करण्यात येईल.

**(७)** प्रकल्पातून सुधारणा करावयाच्या आठवडी बाजारांची संख्या २०० वरून ३०० पर्यंत वाढविण्यात येईल.

**(८)** पशुधन बाजार (जनावरांचा बाजार)ची संख्या १२ वरून २४ पर्यंत वाढविण्यात येईल.

**(९)** प्रकल्पात समाविष्ठ एकूण कृषि उत्पन्न बाजार समित्यांपैकी, किमान १०% बाजार समित्यांमध्ये, संगणकीकृत लिलाव पध्दत किंवा संगणकीय निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

**(१०)** दुग्ध व्यवसाय विपणन विकास, मच्छीपालन विपणन विकास व कृषी विमा यावर अभ्यास करणे, या मुद्द्यांचा समावेश प्रकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

## पुरवणी क्र. ३

## तक्रार / मतभेद निवारण उपाययोजना (CRM)

पर्यावरणविषयक व सामाजिक मुल्यमापनामध्ये, पुनर्वसन व इतर सामाजिक मुद्दयांवर कोणती कार्यवाही करावी याची तक्रार निवारण उपाययोजना तपशालाने नमूद केलेली आहे. त्याव्यतिरिक्त, प्रकल्पाच्या नियोजन व अंमलबजावनी टप्प्यावर, विविध कामकाज करीत असताना उद्भवणा-या अन्य मतभेद व तक्रारींच्या मुद्दयावर करावयाची उपाययोजना खाली नमुद केली आहे. ही उपाययोजना पध्दती तीन स्तरावर मांडण्यात आलेली आहे : स्तर १ (उत्पादक / प्राथमिक घटक), स्तर २ (उपक्रम / जिल्हास्तर) व स्तर ३ (प्रकल्प राज्य स्तर - प्रकल्प अंमलबजावनी कक्ष व प्रकल्प समन्वय कक्ष)

### स्तर १ (उत्पादक / प्राथमिक घटक) :-

| आधार घटक (स्टेक होल्डर्स) | प्रकल्पातील घटक | संभाव्य मतभेद / तक्रार मुद्दा | मतभेद निवारण्यासाठी उपाययोजना | उपाय योजनेची कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादक/ वानामती / आत्मा | बाजारपेठ आधारीत कृषी तंत्रज्ञान प्रसार | -प्रशिक्षण/ प्रात्यक्षिक अपेक्षित गुणवत्तेची नाहीत<br>-प्रात्यक्षिकांच्या निकालाचा पुढे उपयोग होत नाही. | वानामती व उत्पादकांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली वानामती स्तरावरील समिती यावर उपाययोजना करेल. | १५ दिवसाचे कालावधीत | वानामती |
| उत्पादक / कृषी उद्योग उद्योजक | कषी उद्योग विकास सुविधा | -वस्तूस्थितीजन्य मुल्यसाखळीची स्थापना न होणे | उत्पादक व कृषी उद्योग उद्योजकांचे प्रतिनिधींचा समावेश असलेली, कृषी उद्योग विकास सुविधा स्तरावरील समिती, यावर योजना करेल | १५ दिवस | कृषी उद्योग विकास सुविधेचे सेवा पुरवठादार |
| उत्पादक / प्रगत शेतकरी / शासकीय विभाग अधिकारी | बाजारपेठ माहीती सेवा | - बाजारपेठ विषयक माहीती वेळेत मिळत नाही.<br>- मिळालेली माहीती बाजारपेठ विषयक नाही.<br>-लहान व सिमांतिक शेतक-यांना माहीती मिळण्यात अडचण येते. | उत्पादक, प्रगत शेतकरी शासकीय यंत्रणा यांचे प्रतिनिधी, यांचा समावेश असलेली, सहाय्यक निबंधक सह. संस्था यांचे स्तरावरील समिती यावर उपाय योजना करेल. | १५ दिवस | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था |
| उत्पादक | पशुधन सहाय्य सेवा | - विस्तार सेवा अपु-या आहेत, व वेळीच उपलब्ध होत नाहीत. | गांव स्तरावरील कर्मचारी व उत्पादकांचा समावेश असलेली, पशुधन विकास अधिकारी स्तरावरील समिती यावर उपाय योजना करेल. | ३० दिवस | पशुधन विकास अधिकारी |
| उत्पादक / शेतकरी गट | शेतकरी गट / शेतकरी सेवा केंद्रामार्फत कृषी मालाचे एकत्रीकरण व साठवणूक | -लहान व सिमांतिक शेतक-यांच्या उत्पादन व्यवहारामध्ये दिरंगाई तसेच कृ.उ.बा.स.च्या कामकाजामध्ये त्यांचा सहभाग नाही.<br>- प्रकल्पातील या कामकाजास दलालांचा विरोध होवू शकतो. | -उत्पादक संस्था समिती व तिच्या कार्यकारी समितीने याबाबतचे तक्रार निवारण करावे.<br>-गांवसमुह स्तरावरील, उत्पादक संस्थेचे प्रतिनिधींचा समावेश असलेल्या तक्रार निवारण समितीने, तक्रार निवारण करावे. यासाठी संबंधीत शासकीय विभागाच्या अधिका-यांना निमंत्रित करावे. | १५ दिवस | सचिव / अध्यक्ष उत्पादक संस्था |

| आधार घटक (स्टेक होल्डर्स) | प्रकल्पातील घटक | संभाव्य मतभेद / तक्रार मुद्दा | मतभेद निवारण्यासाठी उपाययोजना | उपाय योजनेची कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| शेतीमाल जमा करणारे उत्पादक | वेअरहाऊस पावती सुविधा | -अधिकृत गोदामामध्ये लहान व सिमांतिक शेतक-यांच्या कृषी मालास सुविधा नाकारली जाणे.<br>-लहान व सिमांतिक शेतक-यांना बँकाकडून कर्ज मिळण्यास विलंब होणे. | -बँका आणि लहान व सिमांतिक ोतकरी प्रतिनिधी असलेली ,तालुका निबंधक सह.संस्था यांचे स्तरावरील समिती यावर उपाययोजना करेल. | १५ दिवस | संबंधीत तालुका सहाय्यक निबंधक सहकारी संस्था |
| उत्पादक / व्यापारी | आठवडी बाजार | गांव स्तरावरील व्यापारी, दलाल व इतरांचा प्रस्तावित सुधारणांना विरोध | -आठवडा बाजार व्यवस्थापन समितीमध्ये सर्व संबंधित बाजार घटकांना योग्य प्रतिनिधीत्व देणे,.<br>-ग्रामपंचायतीने तक्रार निवारण करणे.<br>-मूल्य साखळी कामकाजामध्ये व्यापारी, दलाल यांचा समावेश करणे. | १५ दिवस | ग्रा.पं.चे सरपंच / ग्राम विकास अधिकारी |
| व्यापारी | ई-मार्केटींग सुविधा सुरू करणे | व्यापारी व दलाल यांचा प्रस्तावित कामाला विरोध | उत्पादक व दलाल/ व्यापारी यांच्यातील तक्रार व मतभेद मुद्यांचे निवारण संबंधीत कृषि उत्पन्न बाजार समिती करील. | १५ दिवस | कृषिउत्पन्न बाजार समितीचे सभापती / सचिव |
| व्यापारी / शेतकरी | ठोक बाजार पेठांमध्ये सुधारणा करणे | व्यापारी व दलाल यांचा प्रस्तावित कामाला विरोध | उत्पादक व दलाल/ व्यापारी यांच्यातील तक्रार व मतभेद मुद्यांचे निवारण संबंधीत कृषि उत्पन्न बाजार समिती करील. | १५ दिवस | कृषिउत्पन्न बाजार समितीचे सभापती / सचिव |
| पशुधन पालक शेतकरी व व्यापारी | जनावरांचे बाजार आवारामध्ये सुधारणा करणे | खरेदीदार व विक्रेता यांचे नावाची व झालेल्या व्हहाराची नोंद न होणे, ज्यामुळे झालेल्या व्यवहाराबाबत साशंकता निर्माण होणे. | खरेदीदार व विक्रेता यांची नांवे व विक्री झालेल्या व्यवहाराची रक्कम नमुद करून पावती देण्यात येईल. | विक्री झाल्यावर त्वरीत | कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती / सचिव |

स्तर २ (उपप्रकल्प / जिल्हास्तर) :-

| आधार घटक (स्टेक होल्डर्स) | प्रकल्पातील घटक | संभाव्य मतभेद / तक्रार मुद्दा | मतभेद निवारण्यासाठी उपाययोजना | उपाययोजनेची कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादक/ वानामती / आत्मा | बाजारपेठ आधारीत कृषी तंत्रज्ञान प्रसार कार्य | -प्रशिक्षण व प्रात्यक्षिके अपेक्षित गुणवत्तेची नाहीत<br>-प्रात्यक्षिकांच्या निकालाचा पुढे उपयोग होत नाही. | -तक्रार मुद्यांचे निवारण, स्तर क्र.१ वर झाले नसेल, तर त्यांचे निवारण जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी स्तरावरील समिती करेल. समितीमध्ये वानामती व उत्पादकांचे प्रतिनिधी असतील. | ३० दिवस | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| उत्पादक / कृषी उद्योग उद्योजक | कषी उद्योग विकास सुविधा | -वस्तूस्थितीजन्य मुल्यसाखळीची स्थापना न होणे | -स्तर क्र.१ वर मुद्यांचे निवारण न झाल्यास, त्यांचे निवारण जिल्हा उपनिबंधक सह.संस्था स्तरावरील समिती करेल. समितीमध्ये उत्पादक संस्थांचे प्रतिनिधींचा समावेश असेल. | ३० दिवस | जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |
| उत्पादक / प्रगत शेतकरी/ शासकीय अधिकारी | बाजारपेठ माहीती सेवा | - बाजारपेठ विषयक माहीती वेळेत मिळत नाही.<br>- मिळालेली माहीती बाजारपेठ विषयक नाही.<br>-लहान व सिमांतिक शेतक-यांनाही माहीती मिळण्यात अडचण येते. | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण जिल्हा उपनिबंधक सह.संस्था यांचेकडून करण्यात येइल. | ३० दिवस | जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |
| उत्पादक संस्था | पशुधन सहाय्य सेवा | -विस्तार सेवा अपु-या आहेत व वेळीच उपलब्ध होत नाहीत. | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी स्तरावरील समिती करेल.समितीमध्ये उत्पादकांचे प्रतिनिधी असतील. | ३० दिवस | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी |
| उत्पादक / शेतकरी गट | शेतकरी गट / शेतकरी सेवा केंद्रामार्फत कृषी मालाचे एकत्रीकरण व साठवणूक | -कृ.उ.बा.स.च्या कामकाजामध्ये लहान व सिमांतिक शेतक-यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही.<br>-दलालांचा प्रकल्पातील कामकाजास विरोध होवू शकतो. | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण जिल्हा उपनिबंधक सह.संस्था स्तरावरील समिती करेल. या समितीत महिला व दुर्बल घटकांचे प्रतिनिधी असतील, तसेच समितीमध्ये आवश्यकते प्रमाणे शासकीय अधिका-यांचा समावेश करण्यात येईल. | ३० दिवस | जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |

| आधार घटक (स्टेक होल्डर्स) | प्रकल्पातील घटक | संभाव्य मतभेद / तक्रार मुद्दा | मतभेद निवारण्यासाठी उपाययोजना | उपाययोजनेची कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादक / व्यापारी | आठवडी बाजार | गांव स्तरावरील व्यापारी, दलाल व इतरांचा प्रकल्पातील सुधारणांच्या कामांना विरोध | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण जिल्हा उपनिबंधक सह.संस्था स्तरावरील समिती करेल. समितीमध्ये व्यापारी व दलालांचे प्रतिनिधी असतील. | ३० दिवस | जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |
| शेतीमाल जमा करणारे उत्पादक | वेअरहाऊस पावती सुविधा | -अधिकृत गोदामामध्ये लहान व सिमांतिक शेतक-यांच्या कृषी मालास सुविधा नाकारणे.<br>-लहान व सिमांतिक शेतक-यांना बँकाकडून कर्ज मिळण्यास विलंब होणे. | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण, जिल्हास्तरावरील महाराष्ट्र राज्य वखार मंडळाची विभागीय कार्यालय समिती करेल. समितीमध्ये लहान व सिमांतिक शेतक-यांचे व बँकेचे प्रतिनिधी असतील. | ३० दिवस | जिल्हा प्रबंधक महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ |
| व्यापारी | ई-मार्केटींग सुविधा सुरू करणे | व्यापारी व दलाल यांचा प्रस्तावित कामांना विरोध | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण जि.उ.नि.सह.संस्था स्तरावरील समिती करेल. समितीमध्ये व्यापारी, दलाल व म.कृ.प. मंडळाच्या प्रतिनिधीचा व आवश्यकते प्रमाणे संबंधीत शासकीय विभागाच्या अधिका-यांचा समावेश असेल | ३० दिवस | संबंधीत जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |
| व्यापारी / शेतकरी | ठोक बाजार पेठांमध्ये सुधारणा करणे | व्यापारी व दलाल यांचा प्रस्तावित कामांना विरोध | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण जि.उ.नि.सह.संस्था स्तरावरील समिती करेल. समितीमध्ये व्यापारी, दलाल व म.कृ.प. मंडळाच्या प्रतिनिधीचा व आवश्यकते प्रमाणे संबंधीत शासकीय विभागाच्या अधिका-यांचा समावेश असेल | ३० दिवस | संबंधीत जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |
| पशुपालक शेतकरी व व्यापारी | जनावरांचे बाजार आवार सुधारणा | खरेदीदार व विक्रेता यांचे नावांची व झालेल्या विक्री व्यवहाराची नोंद न होणे, ज्यामुळे झालेल्या व्यवहाराबाबत साशंकता निर्माण होणे. | -स्तर क्र.१ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण जि.उ.नि.सह.संस्था स्तरावरील समिती करेल. समितीमध्ये व्यापारी, दलाल व म.कृ.प. मंडळाच्या प्रतिनिधीचा व आवश्यकते प्रमाणे संबंधीत शासकीय विभागाच्या अधिका-यांचा समावेश असेल | ३० दिवस | संबंधीत जिल्हा उपनिबंधक सह. संस्था |

स्तर ३ (प्रकल्प राज्य स्तर - प्रकल्प अंमलबजावनी कक्ष व प्रकल्प समन्वय कक्ष) :-

| आधार घटक (स्टेक होल्डर्स) | प्रकल्पातील घटक | संभाव्य मतभेद / तक्रार मुद्दा | मतभेद निवारण्यासाठी उपाययोजना | उपाययोजनेची कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादक/ वानामती / आत्मा | बाजारपेठ आधारीत कृषी तंत्रज्ञान प्रसार कार्य | -प्रशिक्षण व प्रात्यक्षिके अपेक्षित गुणवत्तेची नाहीत<br>-प्रात्यक्षिकांच्या निकालाचा पुढे उपयोग होत नाही. | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) चे नोडल अधिकारी व कृषी विभागामार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | नोडल अधिकारी (PIU) कृषी |
| उत्पादक / कृषी उद्योग उद्योजक | कषी उद्योग विकास सुविधा | -वस्तूस्थितीजन्य मुल्यसाखळीची स्थापना न होणे | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) चे नोडल अधिकारी व कृषी विभागामार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | नोडल अधिकारी (PIU) कृषी |
| उत्पादक / प्रगत शेतकरी/ शासकीय अधिकारी | बाजारपेठ माहीती सेवा | - बाजारपेठ विषयक माहीती वेळेत मिळत नाही.<br>- मिळालेली माहीती बाजारपेठ विषयक नाही.<br>-लहान व सिमांतिक शेतक-यांनीही माहीती मिळण्यात अडचण येते. | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) चे नोडल अधिकारी व म.रा.कृ.प. मंडळामार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | नोडल अधिकारी (PIU) म.रा.कृ.प. मंडळ |
| उत्पादक | पशुधन सहाय्य सेवा | -विस्तार सेवा अपु-या आहेत व वेळीच उपलब्ध होत नाहीत. | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) चे नोडल अधिकारी व पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | नोडल अधिकारी (PIU) पशुसंवर्धन विभाग |
| उत्पादक / शेतकरी गट | शेतकरी गट / शेतकरी सेवा केंद्रामार्फत कृषी मालाचे एकत्रीकरण व साठवणूक | -कृ.उ.बा.स.च्या कामकाजामध्ये लहान व सिमांतिक शेतकरी, महिला व दुर्लक्षित गटांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही.<br>-दलालांचा प्रकल्पातील कामकाजास विरोध होवू शकतो. | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण म.रा.कृ.प. मंडळ / ESC Cell मार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | म.रा.कृ.प. मंडळ व ESC कक्ष |

| आधार घटक (स्टेक होल्डर्स) | प्रकल्पातील घटक | संभाव्य मतभेद / तक्रार मुद्दा | मतभेद निवारण्यासाठी उपाययोजना | उपाययोजनेची कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| शेतीमाल जमा करणारे उत्पादक | वेअरहाऊस पावती सुविधा | -अधिकृत गोदामामध्ये लहान व सिमांतिक शेतक-यांच्या कृषी मालास सुविधा नाकारणे.<br>-लहान व सिमांतिक शेतक-यांना बँकाकडून कर्ज मिळण्यास विलंब होणे. | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण म.रा.कृ.प. मंडळ / ESC Cell मार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | म.रा.कृ.प. मंडळ व ESC कक्ष |
| उत्पादक / व्यापारी | आठवडी बाजार | गांव स्तरावरील व्यापारी, दलाल व इतरांचा प्रकल्पातील सुधारणांच्या कामांना विरोध | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण म.रा.कृ.प. मंडळ / ESC Cell मार्फत करण्यात येईल. त्यामध्ये संबंधीत शासकीय अधिका-यांचा समावेश राहील. | तीन महिन्याचे कालावधीत | म.रा.कृ.प. मंडळ व ESC कक्ष |
| व्यापारी | ई-मार्केटींग सुविधा सुरू करणे | व्यापारी व दलाल यांचा प्रस्तावित कामांना विरोध | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण म.रा.कृ.प. मंडळ / ESC Cell मार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | म.रा.कृ.प. मंडळ व ESC कक्ष |
| व्यापारी / शेतकरी | ठोक बाजार पेठांमध्ये सुधारणा करणे | व्यापारी व दलाल यांचा प्रस्तावित कामांना विरोध | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण म.रा.कृ.प. मंडळ / ESC Cell मार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | म.रा.कृ.प. मंडळ व ESC कक्ष |
| पशुपालक शेतकरी व व्यापारी | जनावरांचे बाजार आवार सुधारणा | खरेदीदार व विक्रेता यांचे नावांची व झालेल्या विक्री व्यवहाराची नोंद न होणे, ज्यामुळे झालेल्या व्यवहाराबाबत साशंकता निर्माण होणे. | -स्तर क्र.२ वर निवारण न झालेल्या तक्रार मुद्यांचे निवारण म.रा.कृ.प. मंडळ / ESC Cell मार्फत करण्यात येईल. | तीन महिन्याचे कालावधीत | म.रा.कृ.प. मंडळ व ESC कक्ष |